महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक

टोल फ्री क्र .१८०० २६७ ०००७ ई-मेल -: tdd.scholarship-mh@gov.in

संकेतस्थळ:- https://fs.maharashtra.gov.in


---

## अनुसूचित जमातीच्या मुला/मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना.

महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाकडून शासन निर्णय क्र.१५२२/प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि. ७ मार्च २०२४ अन्वये राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी प्रतिवर्षी ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सन २०२६-२७ या वर्षात परदेशात प्रस्तुत अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी मान्यताप्राप्त शिक्षण संस्था / विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

### अ) शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी विहित अटी-शर्ती खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| १. | विद्यार्थी महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीचा असावा. त्याबाबत सक्षम प्राधिका-याकडून जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| २. | विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असल्यासबंधी अधिवास प्रमाणपत्र (नॅशनॅलिटी व डोमेसाईल प्रमाणपत्र) सादर करणे आवश्यक आहे. |
| ३. | ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थाकडून Unconditional Offer letter मिळालेले असेल त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील. सबंधित विद्यापीठाच्या प्रॉस्पेक्टसची प्रत ऑनलाईन अर्ज करतांना सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ४. | विद्यार्थ्यांने पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा पीएचडी साठी अर्ज करताना, या पूर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. योजनेअंर्गत पदवीचा अभ्यासक्रम सुरू असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएडी) साठी तत्सम विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमांसाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्यांने निवडसमितीस रितसर अर्ज करुन याबाबत मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात संबंधित शैक्षणिक संस्थेची अद्यायावत जागतिक क्रमवारी (QS Wordl Ranking) त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकुण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेपर्यंतच दिला जाईल. उदा. विद्यार्थ्यांने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट पदविका करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्यांला निवड समितीने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरची पुढील दोन वर्षासाठी |

| | |
|---|---|
| | शासन निर्णयातील नमूद सगळे लाभ घेता येतील. यानंतर येणारा पुढील खर्च मात्र उमेदवाराला करावा लागेल. |
| ५. | विद्यार्थ्याच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल मर्यादा रुपये ०८.०० लक्ष पर्यत असेल. त्यासंबंधी सक्षम अधिका-यांचे मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नंबर १६ व सक्षम प्राधिकारी यांचेकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. ज्या परदेशी विद्यापीठाचे जागतिक रँकींग (Latest QS world ranking ) २०० पर्यंत आहे अशाच विद्यापीठात प्रवेश मिळालेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहतील मात्र विद्यार्थ्यांची निवड मेरीटनुसार होईल. तथापि विहीत निकषानूसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटुंबाच्या उत्पन्नाची मर्यादा व क्युएस वर्ल्ड रँकीग ची मर्यादा शिथिल करुन सदर लाभ देतांना उत्पन्न मर्यादा रु.८.०० लाखावरून जास्तीत जास्त रु.१० लाख इतकी शिथिल करण्यात येईल. तसेच क्युस वर्ल्ड रँकीग ची मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. |
| ६. | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमासाठी वयोमर्यादा ३५ वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमाकरिता ४० वर्ष वयोमर्यादा इतकी आहे. |
| ७. | विद्यार्थ्यास परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठात प्रथम वर्षाकरिता प्रवेश मिळालेला असावा. परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. |
| ८. | एकदा शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यास विद्यापीठात व अभ्यासक्रमात बदल करता येणार नाही मात्र काही कारणास्तव विद्यार्थ्यांस त्याची निवड झालेल्या अभ्यासक्रमास त्या सत्रात प्रवेश घेता आला नाही तर पुढील सत्रामध्ये त्याच विद्यापीठात व त्याच अभ्यासक्रमास शासन मान्यतेने प्रवेश घेण्यास (फक्त एकदाच) मंजूरी देण्यात येईल. |
| ९. | विद्यार्थ्यांने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे याची माहिती आयुक्तालयास द्यावी. |
| १० | सदर योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल . तसेच एकाच कुटुंबातील दोन पेक्षा जास्त अपत्यांना ही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. या साठी पालक/विद्यार्थ्यांनी तसे हमी पत्र करुन देणे बंधनकारक राहील. |
| ११ | परदेशात अभ्यासक्रमासाठी एकदा निश्चित केलेला कालावधी वाढवता येणार नाही. अथवा शिष्यवृत्तीस मंजूरी घेतेवेळी जो अभ्यासक्रम निवडला आहे त्यात बदल करता येणार नाही. विद्यार्थ्याने निवडलेला अभ्यासक्रम व कालावधी अर्जात स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १२ | अभ्यासक्रम संपल्यावर सबंधित विद्यार्थ्याने त्याचे अंतिम परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र आयुक्त, आदिवासी विकास यांना सादर करणे आवश्यक राहील. तसेच सध्या करीत असलेल्या व्यवसाय ची माहिती देणे आवश्यक राहील. |
| १३ | परदेशातील ज्या विद्यापीठात विद्यार्थ्यास प्रवेश मिळाला आहे. त्या विद्यापीठास व संस्थेस ऑनलाईन प्रणालीनुसार डायरेक्ट खात्यावर शिक्षण फी जमा करण्यात येईल. तथापि विद्यार्थ्यासाठी निर्वाह भत्ता त्याचे खात्यावर जमा करण्यात येईल. या करिता विद्यार्थ्याने भारतात |

| | |
|---|---|
| | राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य राहिल. |
| १४ | प्रवेशित विद्यार्थ्याने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र, केलेल्या खर्चाचा विद्यापीठाकडून प्रमाणित केलेल्या पावत्या, गुणपत्रक, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी सादर करणे बंधनकारक राहिल त्यानंतरच पुढील सत्राची शिष्यवृत्ती आयुक्त, आदिवासी विकास हे मंजूर करतील. प्रवेशित अभ्यासक्रम हा विहीत कालावधीत पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. |
| १५ | अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजने अंतर्गत विद्यार्थ्यास व्हिसा मुदत वाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. अभ्यासक्रमानंतर वर्क व्हिसा आवश्यक असल्यास त्यासाठी विद्यार्थ्यांने रितसर अर्ज करणे आवश्यक असेल. यासाठी अथवा अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यासाठी अतिरिक्त निधी दिला जाणार नाही. |
| १६ | ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश घेणार आहे त्याच अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास फी अनुज्ञेय राहिल, इतर कोणताही अनुषंगिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश फी अनुज्ञेय राहणार नाही. |
| १७ | परदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) तसेच TOFEL (Test of English as a Foreign Language)/ IELTS (International English Language Testing System) या प्रवेश परिक्षा घेतल्या जातात. सदर GRE च्या आधारावर प्रवेश घेणा-या व TOFEL/ IELTS इ. प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. |
| १८ | परदेशात ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची निवड झाली आहे त्या देशाचे पारपत्र (व्हिसा) व पासपोर्ट व आरोग्य विमा मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. |
| १९ | शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याने अर्जासोबत चुकीची माहिती अथवा खोटे कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास अशा विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्तीपोटी शासनाने केलेला संपूर्ण खर्च १२% व्याजासह वसूल करण्यात येईल. परदेशातील शैक्षणिक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य केल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्याच्या परदेश शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ व्याजासह वसूल करण्यात येईल. याबाबत लेखी हमीपत्र विद्यार्थ्यास द्यावे लागेल. |
| २० | अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्कासह येणा-या एकुण खर्चाचे संस्थेचे प्रमाणपत्र (निवास खर्च, भोजन व पुस्तक खर्च) आवश्यक आहे. |
| २१ | शैक्षणिक पार्श्वभूमी आणि पदवीधर अभ्यासासाठी सज्जता दर्शविणारी दोन राजपत्रित अधिका-यांचे शिफारस पत्र अथवा विद्यार्थ्याने शिक्षण घेतलेल्या संस्थेतील दोन प्राध्यापकांची शिफारस पत्र तसेच आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे ऑनलाईन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. |

**ब) अभ्यासक्रमाचा कालावधी:-**

१.पीएचडी साठी ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा कमी असेल तो.

२.पदव्युत्तर पदवी ३ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा कमी असेल तो.

३.पदव्युत्तर पदवीका २ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा कमी असेल तो कालावधी

४.एक्झ्युक्युटीव (executive ) पदव्युत्तर पदवी किंवा एक्झ्युक्युटीव पदव्युत्तर पदवी व अर्धवेळ (part time) अभ्यासक्रमास प्रवेशित विदयार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाही.

क) योजनेतील लाभाचे स्वरुप:-

| | |
|---|---|
| १. | विद्यार्थ्यास शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च हे लाभ देण्यात येतील. |
| २. | शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च यु.एस.ए. व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) १५०० यु.एस.डॉलर (USD) आणि यु.के.साठी ११०० जीबीपी (GBP) इतका दरवर्षी देण्यात येईल. |
| ३. | जवळच्या मार्गाचा येण्या-जाण्याचा विमान प्रवास, व्हिसा फी, आरोग्य विमा हा खर्च आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येईल. |

ख) अर्ज करण्याची पद्धत:-

प्रस्तुत शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणेसाठी विहित नमुन्यात आवेदन महाराष्ट्र शासनाच्या https://fs.maharashtra.gov.in या आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थाळावर भरणे अनिवार्य आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जातील. सन २०२६-२७ या वर्षासाठी अर्ज ऑनलाईन भरण्याकरिता संकेतस्थळ वर्षभर खुले करण्यात आले आहे. प्राप्त अर्जावर निवड समितीद्वारे वेळोवेळी बैठक घेऊन निवड करण्यात येईल. तसेच शासन निर्णयातील लक्षांक पूर्ण झाल्यास संकेतस्थळावरील अर्ज स्विकारणे तसेच निवड प्रक्रिया थांबविण्यात येईल.

ग) संदर्भिय शासन निर्णय :-

उमेदवारांना सदर योजनेच्या सर्व अटी व शर्ती तसेच योजनेचे स्वरुप खालील शासन निर्णयात पाहता येतील व त्यातील सर्व अटी व शर्ती उमेदवारांना लागू राहतील.

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.१५२२/प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि. ७ मार्च २०२४
२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.१५२२/प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि. १२ जुलै, २०२४
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे दिनांक २५ जुलै, २०२४
४. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.१५२२/प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि. ९ सप्टेंबर, २०२४

स्वाक्षरीत/-

**लीना बनसोड, भा. प्र. से,**
**आयुक्त, आदिवासी विकास,**
**महाराष्ट्र राज्य, नाशिक.**